**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः हहाधो-२०२२/प्र.क्र.२५५/ ऊर्जा-७.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १७ ऑक्टोबर, २०२३.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.PSI-2019/C.R.46/IND-८, दिनांक १६.०९.२०१९.
२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. अपाऊ-२०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७, दिनांक ३१.१२.२०२०.
३) केंद्र शासनाच्या हरित हायड्रोजन धोरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचना, दिनांक १७.०२.२०२२.
४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. अपाऊ-२०२१/प्र.क्र.२२४/ऊर्जा-७, दिनांक ३०.०६.२०२२.

**प्रस्तावना :-**

वाढते औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे ऊर्जा संसाधनांच्या मागणीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. जागतिक कार्बन उत्सर्जनाचा महत्त्वाचा भाग ऊर्जा उत्पादन आणि वीजेच्या वापराशी संबंधित आहे. त्यामुळे, सध्यस्थितीत पारंपरिक ऊर्जा स्त्रोताला पर्याय म्हणून नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांचा अवलंब करणे आवश्यक आहे. नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांचे महत्त्व विचारात घेऊन केंद्र शासनाने नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून सन २०३० पर्यंत ५०० गिगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांच्या वापरामुळे ऊर्जा निर्मिती क्षेत्राचे वेगाने डीकार्बनायझेशन होत असून अलिकडच्या काही वर्षातील अनुकूल धोरणात्मक पाठबळ व खर्चातील कपातीमुळे नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांमध्ये वाढ झाली आहे. ऊर्जा संक्रमणाच्या प्रयत्नांमध्ये अवजड उद्योगांचे कमीत कमी कार्बन उत्सर्जन स्त्रोतांकडे संक्रमण करणे हे सध्यस्थितीत गरजेचे आहे. या उद्योगांसाठी प्राथमिक इंधन आणि कच्च्या मालाची गरज पूर्ण करताना पर्यावरणास अनुकूल अशा वैविध्यपूर्ण संसाधनांचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे.

हरित हायड्रोजन आणि त्याची तत्सम उत्पादने (Derivatives) विविध उद्योगांमध्ये प्राथमिक हरित इंधन व कच्चा माल (फीडस्टॉक) म्हणून गरज पूर्ण करू शकते. नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांद्वारे निर्माण झालेल्या वीजेचा वापर करून जल अपघटनाद्वारे (Electrolysis) हरित हायड्रोजनची निर्मिती केली जाते. नवीकरणीय ऊर्जा आणि निव्वळ शून्य उत्सर्जन (Net Zero Emission) या जागतिक ऊर्जा संक्रमणामध्ये हरित हायड्रोजन महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. जागतिक स्तरावर, ऊर्जेची मागणी व पुरवठा विचारात घेऊन काही देशांनी हरित हायड्रोजन निर्मितीचे महत्त्वकांक्षी लक्ष्य निश्चित केले आहे व त्यानुसार कृती करण्यास सुरूवात केली आहे. हरित हायड्रोजनची देशांतर्गत मागणी व यामध्ये भविष्यात होणारी अपेक्षित वाढ, नवीकरणीय ऊर्जेची प्रचंड क्षमता, इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करणे तसेच हरित हायड्रोजनचे उत्पादन आणि निर्यात परिसंस्था निर्माण करण्याची संधी या कारणांमुळे भारताची हरित हायड्रोजन उत्पादनासाठी जागतिक बाजारपेठ बनण्याची क्षमता आहे. मा. प्रधानमंत्री महोदय यांनी भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनी "राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन" जाहिर केले असून भारताच्या हरित हायड्रोजन परिसंस्थेच्या विकासाचा पाया घातला आहे. त्यानंतर, केंद्र शासनाच्या विद्युत मंत्रालयाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ मध्ये हरित हायड्रोजन धोरणाच्या मार्गदर्शक सूचना जाहिर केल्या असून त्यामध्ये, हरित हायड्रोजन उत्पादनाची किंमत कमी करणे, हरित

हायड्रोजनचा पुरवठा आणि Ease of Doing Business या बाबींचा विचार केला आहे. तद्नंतर, केंद्र शासनाने दिनांक १३.०१.२०२३ रोजी "राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन" डाक्युमेंट (NGHM) जाहिर केले आहे. "राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन" अंतर्गत सन २०३० पर्यंत देशात जवळपास ५ मिलियन टन प्रति वर्ष (MTPA) हरित हायड्रोजनची निर्मिती करणे आणि भारताला हरित हायड्रोजन आणि त्याची तत्सम उत्पादनांमध्ये (Derivatives) निर्यात हब बनविणे ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय आणि विद्युत मंत्रालय यांच्याबरोबर यु.के.गव्हर्नमेंट यांचा ASPIRE हा संयुक्त भागीदारी तांत्रिक सहाय्य कार्यक्रम आहे. सदर तांत्रिक सहाय्य कार्यक्रम केंद्र व राज्य दोन्ही स्तरावर राबविला जात आहे. या तांत्रिक सहाय्य कार्यक्रमाची "ग्रीन हायड्रोजन" ही मुख्य थीम आहे. या संयुक्त भागीदारी तांत्रिक सहाय्य कार्यक्रमातंर्गत या विभागाने "महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३" चा मसुदा तयार केला आहे. सदर मसुद्याच्या अनुषंगाने दिनांक २४.०२.२०२३ रोजी सर्व संबंधीत स्टेकहोल्डर्स सोबत प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यानुसार सदर धोरण मसुद्याचे मा.उप मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १७.०४.२०२३ रोजी सादरीकरण करण्यात आले. राज्याला हरित हायड्रोजन आणि त्याच्या तत्सम उत्पादनांचे (Derivatives) व त्यांच्या वापराचे केंद्र बनविणे, हरित हायड्रोजनच्या वापरासाठी नवीन क्षेत्रे खुली करण्यास मदत करणे, संशोधन आणि विकास व तांत्रिक भागीदारीद्वारे या क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहन देणे आणि हरित इंधनाची निर्यात सुलभ करणे याकरीता "महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३" तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्याच्या "महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३" ला या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१) **व्याख्या:-**

१.१ **हरित हायड्रोजन:-** केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १८/०८/२०२३ च्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे हरित हायड्रोजनची व्याख्या निर्धारित केली आहे. या धोरणाच्या उद्देशाकरिता सदर व्याख्या लागू करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने सदर व्याख्येमध्ये वेळोवेळी केलेले बदल/सुधारणा या धोरणास लागू करण्यात येतील. केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १८/०८/२०२३ च्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे निर्धारित केलेली हरित हायड्रोजनची व्याख्या खालीलप्रमाणे आहे:-

**"Green Hydrogen"** shall mean Hydrogen produced using renewable energy, including, but not limited to, production through electrolysis or conversion of biomass. Renewable energy also includes such electricity generated from renewable sources which is stored in an energy storage system or banked with the grid in accordance with applicable regulations.

**Whereas, for Green Hydrogen produced through electrolysis:-** The non-biogenic greenhouse gas emissions arising from water treatment, electrolysis, gas purification and drying and compression of hydrogen shall not be greater than 2 kilogram of carbon dioxide equivalent per kilogram of Hydrogen (kg $CO_2$ eq/kg Hydrogen), taken as an average over last 12-month period.

**Whereas, for Green Hydrogen produced through conversion of biomass:-**The non-biogenic greenhouse gas emissions arising from biomass processing, heat/steam generation, conversion of biomass to hydrogen, gas

purification and drying and compression of hydrogen shall not be greater than 2 kilogram of carbon dioxide equivalent per kilogram of Hydrogen (kg $CO_2$ eq/kg Hydrogen) taken as an average over last 12-month period.

१.२ **अँकर युनिट:** अँकर युनिट म्हणजे महाराष्ट्र राज्यात किमान ५० केटीपीए क्षमतेचे प्रथम कार्यान्वित (commissioned) होणारे ३ हरित हायड्रोजन व तत्सम उत्पादन प्रकल्प.

१.३ **स्थिर भांडवली गुंतवणूक (Fix Capital Investment):** स्थिर भांडवली गुंतवणूक म्हणजे जमीन व इमारत, साठवणूक, वाहतूक, पारेषण इत्यादी घटक वगळून मात्र प्लांट व मशिनरी यांचेवर झालेला खर्च विचारात घेऊन हरित हायड्रोजन व तत्सम उत्पादन प्रकल्प आणि त्याच्याशी शंभर टक्के निगडीत नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पामध्ये केलेली प्रत्यक्ष गुंतवणूक.

२) **धोरणाचा कार्यान्वयन कालावधी:** सदर धोरण दिनांक ३१.०३.२०३० पर्यंत किंवा राज्य शासन या संदर्भात नवीन धोरण जाहीर करेपर्यंत लागू राहील.

३) **धोरणाचे लक्ष्य:-** महाराष्ट्र राज्याचे हरित हायड्रोजन धोरणाचे लक्ष्य महाराष्ट्र राज्यात सन २०३० पर्यंत दरवर्षी किमान ५०० किलोटन (kTPA) हरित हायड्रोजनची उत्पादन क्षमता निर्माण करणे व राज्याला हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांमध्ये (Derivatives) अग्रेसर बनविणे, उद्योगांमध्ये डीकार्बनायझेशनला चालना देणे, ऊर्जा सुरक्षितता वाढविणे आणि हरित हायड्रोजन क्षेत्रात निर्यातीला प्रोत्साहन देणे आहे.

४) **धोरणाची उद्दिष्टे:-**

४.१ ऊर्जेचा अधिक वापर असणारी उद्योग क्षेत्रे तसेच अवजड उद्योगांमध्ये डीकार्बनायझेशन करण्यासाठी कच्च्या मालाचा स्त्रोत व पर्यायी इंधन म्हणून हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादीत (Derivatives) पदार्थांचा विकास होण्यास व वापरास गती देणे.

४.२ जीवाश्म इंधनांऐवजी उपलब्ध असलेल्या नवीकरणीय ऊर्जा संसाधनांचा सर्वोत्तम उपयोग करून ऊर्जा सुरक्षिततेची हमी वाढवणे व स्वच्छ ऊर्जा निर्मितीला चालना देणे.

४.३ हरित हायड्रोजन उत्पादनाशी निगडीत उपकरणांच्या तसेच हरित इंधनाच्या निर्यातीला चालना देणे.

४.४ राज्यामध्ये इलेक्ट्रोलाईझरच्या उत्पादनाला चालना देणे.

४.५ हरित हायड्रोजन व नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रामध्ये गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे व त्या क्षेत्रामध्ये रोजगार निर्मिती करून राज्याच्या अर्थव्यवस्थेचा विकास करणे.

४.६ हरित हायड्रोजन परिसंस्थेसाठी आवश्यक इलेक्ट्रोलाईझर, फ्युएल सेल्स (Fuel cells) आणि या सारख्या तत्सम क्षेत्रात संशोधन व विकास (R&D) करून या क्षेत्रात राज्यास अग्रेसर बनविणे.

४.७ राज्यामध्ये हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांचा (Derivatives) वापर करण्यासाठी पथदर्शी प्रकल्पांच्या विकासास प्रोत्साहन देणे.

४.८ हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांच्या (Derivatives) मूल्य साखळीमध्ये कुशल मनुष्यबळ तयार करून राज्यात रोजगार निर्मितीच्या संधी निर्माण करणे.

४.९ राज्यामध्ये समावेशक व शाश्वत हरित हायड्रोजन परिसंस्था विकसित होण्यास चालना देणे.

५) **या धोरणांतर्गतच्या लाभाकरीता पात्र प्रकल्प:-**

५.१. खालील स्त्रोतातून शंभर टक्के नवीकरणीय ऊर्जेचा वापर करून पाण्याच्या इलेक्ट्रोलिसिस प्रक्रियेद्वारे राज्यात हरित हायड्रोजन आणि त्याचे तत्सम उत्पादन (Derivatives) करणारे प्रकल्प या धोरणातंर्गतच्या लाभास पात्र असतील:-

अ) राज्यात आस्थापित असणाऱ्या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पातून Open Acces मार्गाद्वारे त्रयस्थ पक्षाकडून नवीकरणीय ऊर्जा प्राप्त करणारे प्रकल्प.

आ) स्वयंवापराकरीता राज्यामध्ये/राज्याबाहेर आस्थापित केलेल्या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पातून ऊर्जा प्राप्त करणारे प्रकल्प.

इ) राज्यातील परवानाधारक वीज वितरण कंपन्यांकडून नवीकरणीय ऊर्जा प्राप्त करणारे प्रकल्प.

ई) पॉवर एक्सचेंजकडून नवीकरणीय ऊर्जा प्राप्त करणारे प्रकल्प.

उ) उपरोक्त नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांच्या एकत्रिकरणाद्वारे तसेच सदर स्त्रोतांमार्फत साठवणूक (Storage) करून वीज प्राप्त करणारे प्रकल्प.

५.२. शंभर टक्के नवीकरणीय ऊर्जेचा वापर करून शहरी घनकचऱ्यापासून व बायोमासपासून हरित हायड्रोजन निर्मिती करणारे प्रकल्प देखिल या धोरणाखाली लाभ/सवलती मिळण्यास पात्र असतील.

५.३. सदर धोरण लागू होण्यापूर्वी मान्यता प्राप्त झालेल्या प्रकल्पांना तसेच सदर धोरणाची अंमलबजावणी कालावधी समाप्ती झाल्यानंतर कार्यान्वित झालेल्या प्रकल्पांना या धोरणातंर्गतचे लाभ देय होणार नाहीत.

६) **पात्र प्रकल्प विकासक:** नवीकरणीय उर्जेचा वापर करून पाण्याच्या इलेक्ट्रोलिसीस प्रकियेद्वारे किंवा बायोमास आधारीत किंवा शहरी घनकचऱ्याचा वापर करून किंवा केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने वेळोवेळी सूचित केलेल्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाद्वारे स्वच्छ (Clean)/हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांची (Derivatives) स्वयंवापराकरीता किंवा त्रयस्थ पक्षाला विक्री करण्याकरीता निर्मिती करणारे तसेच कायदेशीर मान्यता असलेल्या व्यक्ती किंवा व्यक्तींचा गट किंवा नोंदणीकृत कंपनी किंवा संघ (Body incorporate or association) (whether incorporated or judicial entity) हरित हायड्रोजन व तत्सम उत्पादनांचा प्रकल्प आस्थापित करण्यासाठी पात्र राहतील.

७) **प्रकल्प नोंदणी**: हरित हायड्रोजन व त्याचे तत्सम उत्पादन प्रकल्प (Derivatives) तसेच सदर प्रकल्पांशी निगडीत राज्यातील नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांची नोंदणी महाऊर्जा कार्यालयाकडून केली जाईल. अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० नुसार नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना नोंदणी फी लागू राहील. तथापि, हरित हायड्रोजन व त्याचे तत्सम उत्पादन प्रकल्पांना (Derivatives) नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही. याबाबतची कार्यपध्दती स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

८) **प्रकल्प मान्यता:** हरित हायड्रोजन व त्याचे तत्सम उत्पादन प्रकल्प (Derivatives) तसेच सदर प्रकल्पांशी निगडीत नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांचे प्रस्ताव विकासक महाऊर्जा कार्यालयाकडे सादर करतील. प्रस्तावांची छाननी करुन महाऊर्जा कार्यालय शिफारशींसह सदर प्रस्ताव ऊर्जा विभागाकडे सादर करेल. सदर प्रस्तावांना अंतिम मंजूरी ऊर्जा विभागाकडून देण्यात येईल. सदर मंजूरी प्रक्रियेची सविस्तर कार्यपध्दती स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

९) **प्रकल्प सुविधा शुल्क:** हरित हायड्रोजन व त्याचे तत्सम उत्पादन (Derivatives) प्रकल्पांची नोंदणी करताना विकासकास रुपये १०,००० प्रति मेगावॅट इलेक्ट्रोलाईझर क्षमतेनुसार प्रकल्प सुविधा फी महाऊर्जा कार्यालयाकडे जमा करावी लागेल.

**१०) राज्यातील हरित हायड्रोजन व त्याचे तत्सम उत्पादन प्रकल्प (Derivatives) व या प्रकल्पांशी शंभर टक्के निगडीत नवीकरणीय ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना खालील लाभ व सवलती अनुज्ञेय राहतील:-**

१०.१ हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांसाठी (Derivatives) एकल (Stand-alone) नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांद्वारे प्राप्त केलेल्या ऊर्जेकरीता राज्यातंर्गत पारेषण शुल्क

(Transmission charges) आणि व्हिलिंग चार्जेसमध्ये (Wheeling charges) प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून पुढील १० वर्षासाठी ५० टक्के सवलत लागू राहील.

१०.२ हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांसाठी (Derivatives) संकरित (Hybrid) नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांद्वारे प्राप्त केलेल्या ऊर्जेकरीता राज्यातंर्गत पारेषण शुल्क (Transmission charges) आणि व्हिलिंग चार्जेसमध्ये (Wheeling charges), प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून पुढील १० वर्षासाठी ६० टक्के सवलत लागू राहील.

१०.३ केंद्र शासनाच्या ग्रीन एनर्जी ओपन ॲक्सेस नियम, २०२२ नुसार हरित हायड्रोजन/हरित अमोनिया प्रकल्पांसाठी नवीकरणीय ऊर्जा वापरल्यास, क्रॉस-सबसिडी अधिभार (Cross Subsidy surcharge) व अतिरिक्त अधिभारामध्ये (Additional surcharge) मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून सूट देण्यात येईल. सदरची सवलत राज्यातील सर्व हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादन (Derivatives) प्रकल्पांना प्राप्त होईल.

१०.४ हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांसाठी (Derivatives) एकल (Stand-alone) नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांद्वारे प्राप्त केलेल्या वीजेकरीता विद्युत शुल्कामध्ये (Electricity Duty) प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून पुढील १० वर्षासाठी शंभर टक्के सूट लागू राहील.

१०.५ हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम उत्पादनांसाठी (Derivatives) संकरित (Hybrid) नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांद्वारे प्राप्त केलेल्या वीजेकरीता विद्युत शुल्कामध्ये (Electricity Duty) प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून पुढील १५ वर्षासाठी शंभर टक्के सूट लागू राहील.

१०.६ धोरण कालावधीमध्ये कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (CNG) आणि पाईप्ड नॅचरल गॅस (PNG) नेटवर्कमध्ये हरित हायड्रोजनचे संमिश्रण (Blending) केल्यानंतर ५ वर्षाकरीता ग्रीन हायड्रोजनच्या प्रत्येक किलोग्रॅमसाठी ५० रुपये अनुदान देण्यात येईल.

१०.७ वीज बँकिंग (Banking Facility) व वीज बँकिंग शुल्क (Banking Charges) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमनानुसार लागू राहील.

१०.८ वरील लाभांसोबत हरित हायड्रोजन व त्याच्या तत्सम (Derivatives) उत्पादन प्रकल्पांना महाराष्ट्र राज्यात उद्योगांसाठी जाहिर करण्यात आलेली "पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टीव्हज" मधील अनुज्ञेय लाभ व सवलती सुध्दा देण्यात येतील. मात्र, पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टीव्हज अंतर्गतचे काही लाभ व सवलती जसे की, विद्युत शुल्क सवलत महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३ अंतर्गत समाविष्ट आहेत. अशा समान स्वरूपाच्या सवलती व लाभ विकासकाला एकाच योजनेतून अनुज्ञेय राहतील. तसेच उद्योग विभागाने, राज्यामध्ये इलेक्ट्रोलायझरचे उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक प्रोत्साहानात्मक उपाययोजना कराव्यात.

१०.९ धोरण कालावधीमध्ये राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिवहन उपक्रमातील पहिल्या ५०० हरित हायड्रोजन आधारीत फ्युएल सेल (Fuel-cell) प्रवासी वाहनांना राज्य परिवहन विभागामार्फत ३० टक्के भांडवली खर्च अनुदान (CAPEX Subsidy) देण्यात येईल. वाहन अनुदानाची कमाल मर्यादा रु. ६० लाख प्रति वाहन इतकी असेल. एका शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिवहन उपक्रमास जास्तीत जास्त ५० हरित हायड्रोजन आधारीत फ्युएल सेल (Fuel-cell) प्रवासी वाहनांपर्यंत सदर लाभ अनुज्ञेय राहील.

१०.१० धोरण कालावधीमध्ये राज्यामध्ये आस्थापित होणाऱ्या पहिल्या २० हरित हायड्रोजन रिफ्युलिंग (Hydrogen refuelling) स्टेशनला ३० टक्के भांडवली खर्च अनुदान (CAPEX Subsidy) परिवहन विभागामार्फत देण्यात येईल. हायड्रोजन रिफ्युलिंग स्टेशन अनुदानाची कमाल मर्यादा रु. ४.५० कोटी प्रति रिफ्युलिंग (Hydrogen refuelling) स्टेशन इतकी असेल.